www.loksatta.com

इंडियन एक्स्प्रेस ग्रुप

मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिध्द

# लोकसत्ता

२.५० रूपये, नागपूर, शनिवार, ७ फेब्रुवारी २००९ • वर्ष १७ • अंक २५६ • पृष्ठे १० + नागपूर वृत्तांत + चतुरंग • शहर आवृती Reg. No.RNP/NPCity/45/2009-11



# महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षणाची गरज –स्मृती इराणी

नागपूर, ६ फेब्रुवारी / प्रतिनिधी

पुरुष आणि महिलांच्या बौद्धिक क्षमता सारख्या असल्या तरी, तिला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध अभिनेत्री स्मृती इराणी यांनी केले. नागपूर ऑब्स्टेटिक्स अॅण्ड गायनाकोलॉजिकल सोसायटीच्या वतीने वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या डॉक्टरांचा उत्तर अंबाझरी मार्गावरील आयएमए सभागृहात सत्कार करण्यात आला. यावेळी 'महिलांना सर्व क्षेत्रात ३३ टक्के आरक्षण आणि समाजावर होणारा परिणाम' या विषयावर त्या व्याख्यान देत होत्या.



स्मृती इराणी डॉ. अशोक अढावू यांचा सत्कार करताना.

ग्रामीण भागातील महिलांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागतो. त्यांचे हे श्रम कुटुंबासाठी असतात. त्यांना समाजात प्रतिष्ठेचे जीवन जगता यावे म्हणून आरक्षणच नव्हे तर, त्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिली पाहिजे आणि त्यासाठी शिक्षणाचा प्रसार ग्रामीण भागात होणे गरजेचे आहे, असे सांगून, महिलांच्या आरक्षणाच्या विषयाकडे केवळ एक शासकीय कार्यक्रम म्हणून न बघता तिच्या व्यक्तिगत विकासाकडेही लक्ष देण्याची गरज स्मृती इराणी यांनी व्यक्त केली.

व्यासपीठावर डॉ. सुनिता घिके, डॉ. ...न्य शेंबेकर, डॉ. सुब्रतो दासगुप्ता हे उपस्थित होते. याप्रसंगी पद्मश्री डॉ. बी.एस. चौबे, डॉ. अशोक गुप्ता, आयएमएचे अध्यक्ष डॉ. अशोक अढावू, डॉ. शाम बाभुळकर, डॉ. किशोर टावरी, डॉ. लीना एनेगोंडीकर, डॉ. प्रभा भट्टाचार्य, डॉ. कमल देशमुख, डॉ. शकिला खान, डॉ. मंगला मुळिक, डॉ. सुमी रिधोरकर, डॉ. कमल शास्त्रकार, डॉ. रेणुका सुर्वे, डॉ. नलिनी टोरने, डॉ. प्रमिल आसोलकर, डॉ. आशा देशपांडे, डॉ. मीनाक्षी देशमुख, डॉ. निर्मला मुकादम, डॉ. सुनिता मजुमदार, डॉ. सम्मद फिरोजा, डॉ. सुमन सुभेदार, डॉ. मंगला रोहतगी, डॉ. कुसुम वांकर यांचा सत्कार करण्यात आला. स्वागतगीत डॉ. मेघना गोसावी आणि निशा भोळे यांनी सादर केले. संचालन अनुजा भालेराव यांनी मानले. ■